कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

नोटीस

नागपूर महानगरपालिकेची विशेष सभा मंगळवार दिनांक 05/03/2019 रोजी दुपारी 01—00 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे खालील विषयावर विचार करण्यांकरिता भरणार आहे.

आदेशान्वये,

हस्ता/—
(हरीश नवलकिशोर दुबे)
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

नागपूर
दिनांक :— 01/03/2019

वि.क्र.308 :— विकास योजना — नागपूर.

{नगर रचना विभाग} मौजा — सिताबर्डी, कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी. चौकापर्यंत विकास योजनेतील प्रस्तावित असलेला 30.00 मी. रूंदीचा रस्ता 33.00 मी. रूंद करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनिमयम 1966 चे कलम—37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस —2496—2643—प्र.क्र. 300(अ)—97—नवि—9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस—2400—1628—सी.आर.—200— नवि—9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09. 2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस—2401—885— प्र.क्र.—76/नवि—9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या दि. 20.09.2018 रोजीच्या पत्रान्वये मेट्रो व्हायडक्ट कम फोर लेन फलायओव्हर चे बांधकामाकरीता कामठी रोडवरील गड्डीगोदाम चौक, (गोलबाजार) ते पाटणी ऑटोमोबाईल पर्यंत विद्यमान 20.00 मी. रूंदीचा रस्ता 37.00 मी. रूंद करणे, याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने नगर रचना विभागाने सदर फेरबदलाचा प्रस्ताव मा. सभागृहाचे मान्यतेसाठी सादर केलेला होता. उक्त प्रस्तावास मा. महासभेने ठराव क्र. 309, दि. 20.12.2018 अन्वये मंजुरी प्रदान केलेली असून त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये आवश्यक असलेली कार्यवाही जसे महाराष्ट्र शासन राजपत्रात व वर्तमान पत्रातील प्रसिध्दीकरणाची कार्यवाही ईत्यादी कार्यवाही सूरू करण्यांत आलेली आहे. व त्याअनुषंगाने जनतेकडून त्यांच्या हरकती/सुचना मागविण्यांत आलेल्या आहेत.

तथापी, आता महामेट्रो यांनी दि. 18.02.2019 च्या पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव सादर केलेला असून यामध्ये व्हायडक्ट व फ्लायओव्हरच्या प्रस्तावित बांधकामाचे स्थान बदलण्यात आलेले असून त्याप्रमाणे सुधारीत प्रस्ताव सादर केलेला आहे. महामेट्रो यांच्या पत्रानूसार पुर्वीच्या प्रस्तावामध्ये स्थानिक नागरीकांनी रस्ता रूंदीकरणाबाबत केलेल्या तक्रारीनूसार महामेट्रोचे महाव्यवस्थापक, संबंधीत प्रभागातील मा. नगरसेवक तसेच आमदार महोदयांसोबत झालेल्या चर्चेनुसार गड्डीगोदाम चौक ते पाटनी ऑटोमोबाईल चौका दरम्यान शाळा असल्यामुळे या ठिकाणी फ्लायओव्हर व रॅम्पचे बांधकामामुळे या शाळामधील विद्यार्थ्यांकरीता सदर बांधकाम धोकादायक होईल, त्यामुळे सदर प्रस्तावित बांधकामाचे स्थान पाटनी ऑटोमोबाईल चौक ते एल.आय.सी. चौक या दरम्यान प्रस्तावित केलेले आहे व तसा फेरबदलाचा प्रस्ताव महामेट्रो यांनी महानगरपालिकेकडे सादर केलेला आहे. महामेट्रो यांच्या पत्रान्वये केंद्रीय मंत्री मा. नितिनजी गडकरी यांचेसोबत प्रस्तावित फ्लायओव्हर व रॅम्पचे स्थानमान बदलण्याबाबत सुध्दा चर्चा करण्यात आली असल्याचे नमुद असून मा. मंत्री महोदयांशी चर्चा होवून त्यांचे अनुमतीप्रमाणे पाटणी ऑटोमोबाईल चौक ते एल.आय.सी. चौकापर्यंत प्रस्तावित रॅम्पच्या दोन्ही बाजुला 5.50 मी. रूंदीचा सर्व्हिस रोड व 1.50 मी. रूंदीचा फुटपाथ यासह रॅम्प व फ्लायओव्हरचे बांधकाम करण्याबाबत दि. 14.02.2019 रोजीच्या बैठकीमध्ये ठरलेले असल्याचे मेट्रोच्या प्रस्तावात नमुद आहे. यास्तव कामठी रस्त्यावरील पाटणी ऑटोमोबाईल चौक ते एल.आय.सी. चौकापर्यंत वरील प्रस्तावित बांधकामास्तव रस्ता रूंदीकरण करणे आवश्यक आहे. याकरीता विकास योजनेमधील प्रस्तावित 30.00 मी. रूंदीचा रस्ता 33.00 मी. रूंदीचा प्रस्तावित करणेकरीता फेरबदलाचा प्रस्ताव महामेट्रो यांनी महानगरपालिकेकडे सादर केलेला आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत पाटणी ऑटोमोबाईल चौक ते एल.आय.सी. चौक या दरम्यानचा रस्ता 30.00 मी. रूंदीचा प्रस्तावित आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन/भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना मेट्रो व्हायडक्ट कम फोरलेन फ्लायओव्हरच्या बांधकामाकरीता मंजुर विकास योजनेतील प्रस्तावित 30.00 मी. रूंदीचा रस्ता सार्वजनिक प्रयोजनार्थ 33.00 मी. रूंदीचा करणे आवश्यक आहे. विकास योजनेतील प्रस्तावित 30.00 मी. रूंदीचा रस्ता 33.00 मी. रूंदीपर्यंत केल्यास मेट्रो रेल्वेतर्फे या ठिकाणी प्रस्तावित असलेले फ्लायओव्हर रॅम्प, फुटपाथ, सर्व्हीस रोड इत्यादी विकासकामे करणे मेट्रो रेल्वेला सोयीचे होईल. त्यामुळे सदर रस्त्याची रूंदी 33.00 मी. प्रस्तावित करण्यात येत आहे. याकरीता मौजा–सिताबर्डी येथील पाटणी ऑटोमोबाईल चौक ते एल.आय.सी. चौक या दरम्यानच्या रस्त्याचे दोन्ही बाजुचे अंदाजीत 2704.00 चौ.मी. क्षेत्र 33.00 मी. रूंद प्रस्तावित रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होत आहे. यास्तव कामठी रोड पाटणी ऑटोमोबाईल चौक ते एल.आय.सी. चौकापर्यंत विकास योजनेतील प्रस्तावित 30.00 मी. रूंदीचा रस्ता विकास योजनेत 33.00 मी. करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये फेरबदल प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावाची संपुर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावित विकास योजना रस्त्याकरीताचे समुचित प्राधिकरण हे महानगरपालिका, नागपूर राहील. याकरीता महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर आक्षेप /हरकतीवर योग्य निर्णय घेवून व तद्नंतर त्यानूसार उक्त प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

वि.क्र.309ः– {वित्त विभाग} नागपूर महानगरपालिकेला बॅक ऑफ महाराष्ट्र कडून मंजूर रू 200 कोटी नवीन कर्जाच्या (Fresh Term Loan) प्रस्तावास स्थायी समिती च्या मंजूरीनुसार मनपा महासभेव्दारे अंतिम मंजूरीचा प्रश्न विचारात घेणे

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सहा. महाप्रबंधक, बॅक ऑफ महाराष्ट्र, प्रादेशिक कार्यालय, सिताबर्डी, नागपूर यांचे दिनांक 20/12/2018 चे पत्रानुसार बॅक ऑफ महाराष्ट्रने रू 200 कोटी

नविन कर्ज (Fresh Term Loan) 9.75 P.A. (Fixed) व्याज दरावर खालील नमूद अटी व शर्तीवर मंजूर करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

अ) सुविधा– 1 (Term Loan IV)

1) 2)	सिमेंट रस्ते प्रकल्प (फेज –II व फेज–III) सुरक्षा ठेव– मनपाला प्राप्त होणारे सर्व प्रकारच्या करापासून उत्पन्नामध्ये हायपोथिकेशन करणे	रू 128 कोटी
3)	मार्जिन	36.29%
4)	व्याजाचा दर	9.75 P.A. (Fixed)
5)	Reset of Interest Rate	Annually
6)	मोरेटेरियम कालावधी	12 महिने (कर्जाचा प्रथम हप्ता उचल केल्याचा दिनांकापासून)
7)	कर्ज उचल मर्यादा	31.03.2020
8)	कर्ज परतफेड कालावधी	72 महिने (मोरेटेरियम कालावधी वगळून)
9)	कर्ज परतफेडीबाबतचा हप्ता	71 समान हप्ते रू 1.80 कोटी दरमहा शेवटचा हप्ता रू 0.20 कोटी
10)	प्रोसेसींग फि व इतर शुल्क	निरंक
11)	विशिष्ट अट	Undertaking from NMC for debiting their account on due date for recovery of interest and instalment to be obtained and with standing Instructions.

ब) सुविधा– 2 (Term Loan V)

1)	कर्ज मर्यादा अमृत योजने अंतर्गत विकास कामे घेण्याकरीता	72 कोटी
2)	इतर शर्ती व अटी	वरील सुविधा क्रमांक 1 प्रमाणे लागू राहतील
3)	कर्ज परतफेडीचा हप्ता	72 समान हप्ते प्रत्येकी दरमहा 1.00 कोटी

उपरोक्त 'अ' व 'ब' व्यतिरिक्त सदर कर्जाच्या रकमेमधून प्राधान्यानुसार बुधवार बाजार व सक्करदरा मार्केट विकास कामासाठी रू 25 कोटी व रू 25 कोटी मेट्रो मॉल/ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पासाठीं निधी उपयोगात आणण्यासाठी चा समावेश करण्यास मंजूरी प्रदान करणे त्यामुळे वरील अ व ब च्या कर्ज रकमेपैकी प्रत्येकी रू 25 कोटी कमी करून एकूण रू 50 कोटी या कामासाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे.

हया व्यतिरिक्त बॅक ऑफ महाराष्ट्र ने सदर कर्जाकरीता इतर सामान्य 25 अटी व शर्ती तसेच कर्ज मंजूरीच्या प्रस्तावात नमूद केलेल्या आहेत व इतर अटी खालील प्रमाणे आहे.

1) सदर कर्जाची रक्कम ज्या प्रकल्पाकरीता मंजूर करण्यात आली आहे. त्याच प्रकल्पासाठी खर्च करावयाची आहे.

2) हया कर्ज परतफेडीसाठी महानगरपालिका व बॅंकेसोबत एस्क्रो ॲग्रीमेंट सुध्दा करावयाचे आहे.

3) हया कर्जासाठी महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचे मॉरगेज ठेवायचे नसून हयासाठी शासन हमीची सुध्दा आवश्यकता नाही

4) सदर नविन कर्ज मंजूरीसाठी मनपा व बॅक ऑफ महाराष्ट्र मध्ये करावयाचा करारनामावर इतर तत्सम कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासाठी मनपाचे प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांना प्राधिकृत करण्यास व मनपाला बॅंक ऑफ महाराष्ट्र कडून उपरोक्त नमूद रू 200 कोटी चे कर्ज व हया कर्जाचा व्याज दर निश्चीत करण्यासाठी स्थायी समितीने ठराव मंजूर करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी सादर करण्यात येते की नागपूर मनपाचे स्थायी समितीने ठराव क्रमांक 07 दिनांक 9/3/2018 प्रमाणे व मनपा महासभा ठराव क्रमांक 205 दिनांक 27/3/2018 नुसार मनपाकडील पूर्वीच्या कर्जाचे (जेएनएनयुआरएम अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना पेंच 4 पार्ट 1 करीता घेतलेल्या कर्जाचे) पुर्नःएकीकरण (Top Up) करण्याचे प्रस्तावास मंजूरी दिली आहे मात्र

शासनाने नागपूर महानगरपालिकेला महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक – नामपा 2018/ प्र.क्र.73/नवि 26 दिनांक 4 ऑगष्ट 2018 नुसार मोठया भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पाकरीता आवश्यक निधी व विविध प्रकल्पासाठी मनपा हिस्सा उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने रू 200 कोटीचे नविन कर्ज घेण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच सदर कर्जाच्या अटी व शर्ती संबंधित वित्तीय संस्था व नागपूर मनपा यांनी परस्पर संमतीने मान्य करावयाच्या आहेत.

सदर कर्जाचे व्याजदर कमी करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक 787/प्रलेविअ/2018 दिनांक 31/12/2018 नुसार बॅक ऑफ महाराष्ट्र ने मंजूर केलेला व्याजदर 9.75 हा कमी करण्यासाठी विनंती करण्यात आली होती. मात्र क्षेत्रिय प्रबंधक बॅक ऑफ महाराष्ट्र, प्रादेशिक कार्यालय, सिताबर्डी, यांनी त्यांचे पत्र क्रमांक AX7/NZ/ADV/2018-19-4729 Date 03.01.2019 नुसार व्याजदर 9.75% स्विकारण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे बॅक ऑफ महाराष्ट्रने सदर कर्जाकरीता व्याजदर कमी केलेला नाही.

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता नागपूर महानगरपालिकेला बॅक ऑफ महाराष्ट्रने मंजूर केलेले रू 200 कोटीचे कर्जाकरीता खालील प्रमाणे स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

1) बॅक ऑफ महाराष्ट्र चे प्रस्तावानुसार सदर कर्ज मंजूरी साठी व मनपाचे आर्थिक हिताचे दृष्टीने व व्याज दराबाबत भविष्यात लेखा आक्षेप येवू नये म्हणून सदर कर्जाचा व्याज दर निश्चीत करण्याची बाब ही आर्थिक बाबींशी निगडीत असल्याने यास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करणे.

2) बॅक ऑफ महाराष्ट्र ने रू 200 कोटी कर्ज मंजूर करतांना नमूद केलेला व्याजदर 9.75 P.A. (Fixed) हयाबाबत बॅकेला मनपाचे आर्थिक हिताचे दृष्टीने बॅक ऑफ महाराष्ट्रशी वाटाघाटी करण्याबाबत निर्णय घेणे.

3) बॅक ऑफ महाराष्ट्र ने त्यांचे प्रस्तावात नमूद केलेले व्याजदराची Annual Reset च्या अटीबाबत निर्णय घेणे.

करीता वर नमूद प्रस्ताव स्थायी समितीचे मंजूरी नंतर अंतिम मंजूरी करीता मनपा महासभेसमोर सादर करण्याचे मंजूरीस्तव प्रश्न समितीने विचारात घेवून रू 200 कोटी कर्ज रक्कमेचे पुनर्नियोजन खालील प्रमाणे

1) अमृत पाणी पुरवठा प्रकल्प– रू 50 कोटी
2) सिमेंट कॉक्रीट रोड टप्पा 2/3– रू 50 कोटी
3) बुधवार बाजार व सक्करदरा मार्केट विकसन – रू 25 कोटी
4) मेट्रो मॉल/ऑरेंज सिटी स्ट्रिट प्रकल्प विकसन – रू 25 कोटी
5) ओ. सी. डब्ल्यू. थकबाकी प्रदान करणे– रू 50 कोटी

(Annual Reset ची अट बॅकेकडून शिथील करण्यात आली आहे.)

या वरील सुचनेसह स्थायी समिती ने ठराव क्रमांक 825 दिनांक 21/02/2019 नुसार मंजूरी प्रदान केली असून त्यानुसार सदर प्रस्ताव मनपा महासभेसमोर अंतिम मंजूरी करीता सादर.

वि.क्र.310:–
{लोककर्म झोन १०}

मौजा – सिताबर्डी कामठी रोड (राष्ट्रीय महामार्ग क्र. ७) येथील एल.आय. सी. चौक ते माउन्ट रोड चौक (फ्लॉयओव्हर रॅम्प) चौकापर्यंत मेट्रोचे कामासह, सदरील राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूलाचे काम महामेट्रो तर्फे प्रस्तावित आहे. या ठिकाणी उड्डाणपूलाच्या रॅम्प करीता ३३.०० मी. रूंद रस्त्याची आवश्यकता आहे. अस्तित्वातील रस्त्याची रूंदी कमी उपलब्ध असल्याने रस्त्याचे दोन्ही बाजुला जागा संपादीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार मौजा–सिताबर्डी येथील अंदाजे २७०४.०० चौ.मी. जागा या कामास्तव आवश्यक असल्याने या जागेचे भुसंपादन करून जागा उपलब्ध करून देण्याबाबत महामेट्रो ने मनपाला पत्र क्र. एन.एम.आर.सी.एल/पी.एल.जी –२/२०१८/३१७/३०७४ दि. १८.०२.२०१९ अन्वये कळविले आहे. तसेच या भुसंपादनकरीता अंदाजे रू. ५०.७६ कोटीचा निधीची आवश्यकता आहे असे ही कळविले आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१७ प्र.क्र. ६१७/नवि–३३ दि. ०४.०५.२०१८ नुसार राष्ट्रीय महामार्गावरील राबविण्यात येणारे प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण व्हावेत, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादीत करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेची आहे, त्यामुळे त्या–त्या महापालिकेनी जागा संपादीत कराव्यात व याकरिता या शासन निर्णयाव्दारे निधी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती

नगरोत्थान महाअभियानाचे माध्यमातून ७० टक्के राज्य शासन व ३० टक्के म.न.पा. आर्थिक सहभाग या प्रमाणात निधी उभारता येईल.

करिता मेट्रोच्या विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या अंदाजे एकूण रू. ५०.७६ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातंर्गत निधी उपलब्ध करून देण्यास्तव पाठविण्यास मंजुरी देण्याचा व ३० टक्के अंदाजे राशी रू. १५.२३ कोटी म.न.पा.चा आर्थिक सहभाग म्हणून देण्याचा तसेच भविष्यात यात काही बदल झाल्यास त्याप्रमाणात म.न.पा. चा आर्थिक सहभाग वाढविण्याचे/कमी करण्याचे अधिकार आयुक्त म.न.पा. यांना देण्याच्या प्रश्न पुनश्चः विचारात घेणे.

टिप :—

१) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.311 :— {स्थावर विभाग}

महानगरपालिका मालकीच्या मौजा पांढराबोडी, न.भु. शिट क्र. २९ आणि ३४, न. भु. क्र. ४७७, एकुण क्षेत्र १२९९०.१० चौ.मी. ,पैकी ११७७.६० चौ.मी. जमिन प्रचलित बाजारमुल्यानुसार अधिमुल्य राशी रु. ४,०५,०९,४४०/— व यावर २% भु—भाटक रु. ८,१०,१८९/— प्रतीवर्ष शुल्क आकारुन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU),यांना स्टुडीयो आणि विभागीय कार्यालय उभारण्यासाठी ३० वर्षाचे भाडेपट्ट्यावरखालील नमुद अटि व शर्तीच्या अधिन राहुन आवंटीत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

अटी व शर्ती :—

१. मौजा पांढराबोडी न. भु. क्र. ४७७, न.भु. शिट क्र. २९ आणि ३४ मधील नागपूर महानगरपालिकेच्या रामनगर शाळेच्या जागेपैकी ५१.२० मी. x२३.०० मी. =११७७.६० चौ. मी. जागा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) नाशिक यांना ''आभासी केंद्र'' स्थापनेकरीता व संचालनाकरीता ३० वर्षाचे भाडेपट्ट्यावर देण्यात येईल. याकरीता एकुण प्रव्याजी रु. ४,०५,०९,४४०/—आणि भु—भाटक प्रतिवर्ष रु. ८,१०,१८९/—भरणा करणे बंधनकारक राहील.

२. अशा भाडेपट्ट्याची मुदत ही, मंजुरीचे दिनांकापासुन सुरुवात होवुन ३० वर्ष राहील. मुदत संपल्यानंतर पुढील कालावधीसाठी नुतनिकरणाचे अधिकार महानगर पालिकेकडे राखीव असतील. नुतनिकरणासंबंधात महानगरपालिकेने वेळोवेळी पारित केलेले ठराव व शासनाचे निर्णय भाडेपट्टेदारास बंधनकारक असतील.

३. स्थावर विभागाचे पुर्व परवानगीशिवाय या जागेचे हस्तांतरण, गहान वा विभाजन इ. कुणालाही करता येणार नाही.

४. आभासी केंद्राचे माध्यमातुन महानगरपालिकेकरीता शिक्षणाशिवाय कार्यक्रम, आरोग्यविषयक मार्गदर्शन सभा, चर्चासत्र, उद्‌बोधन शिबीर, सेमिनार इत्यादिकरीता स्टुडीओ आणि आभासी केंद्राचा वापर प्राधान्याने व विनामुल्य करील. सदर्हू जागेचा वापर वरील शैक्षणिक प्रयोजना व्यतिरीक्त इतर वापराकरीता करता येणार नाही.

५. सदर्हु जागेवरील प्रस्तावित इमारतीचे बांधकाम अथवा विद्यमान बांधकामातील दुरुस्ती इ. करीता स्थावर विभागाची पुर्व परवानगी घ्यावी. तसेच विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार, नगर रचना, म.न.पा. ची पुर्व मंजुरी घेवुनच स्वखर्चाने बांधकाम करावे आणि नागरी सोयी उपलब्ध करुन घ्याव्यात. इमारतीच्या व स्टुडीओच्या देखभालीची जबाबदारी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU), नाशिक यांची राहील.

६. सदर्हु इमारतीचे बांधकाम दरम्यान महानगरपालिकेच्या मालमत्तेस क्षती अथवा नुकसानी पोहचवु नये, असे झाल्यास संबंधीत नुकसान भरपाईची जबाबदारी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU), नाशिक यांची राहील.

७. दोन्ही पक्षादरम्यान याबाबत भाडेपट्टा/करारनामा करण्यात येईल. व त्यातील अटी/शर्ती दोन्ही पक्षांना बंधनकारक राहतील. अटी/शर्तीचे उल्लंघन झाल्यास भाडेपट्टा रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहील.

८. महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी याना कार्यालयीन कामकाजा करिता सदर्हु क्षेत्रात प्रवेश खुला राहील.

टिप :—

- मौजा पांढराबोडी, न.भु. शिट क्र. २९ आणि ३४, न. भु. क्र. ४७७, एकुण क्षेत्र १२९९०.१० चौ.मी., या मिळकतीचे हक्काचे मुळधारक नागपूर महानगरपालिका आहे. यापैकी २०५७.५२ चौ.मी., जागा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ(YCMOU),नाशिक यांना ''आभासी केंद्र'' करीता मुख्य स्टुडीयो आणि विभागीय कार्यालय उभारण्यासाठी महानगरपालिका ठराव क्र. २८५ दि. २९.०८.२००८ यातील लादलेल्या अटीं व शर्थीवर ३० वर्षाचे भाडेपट्ट्यवर या जागेचे अधिमुल्स राशी तत्कालीन रेडी रेकनर प्रमाणे प्रव्याजी रु. ८२,०६,०८०/— व वार्षिक भु—भाटक रु. १,६४,१२२/— आकारुन देण्यास मंजुरी प्रदान आहे.

- प्रचलीत बाजार मुल्य दरानुसार सदरील जागेची तत्कालीन किंमत रु. ५.०० लक्ष पेक्षा जास्त असल्याने तत्कालीन नागपूर महानगरपालिका अधिनियम १९४८ चे कलम ७० (५) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेस दि. २४.११.२००८ चे पत्रान्वये विनंती केली होती. यावर शासन पत्र दि. २४.०३.२०१८ अन्वये ''सद्य:स्थितीत सन २०१२ पासुनMMC Act1949 लागु झाल्यामुळे या अधिनियमातील तरतुदी तपासुन आवश्यकता असल्यास प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा,'' असे नमुद आहे.

- या जमिनीचे हक्काचे मुळधारक नागपूर महानगरपालिका आहे.MMC Act१९४९कलम ७९ (C) नुसार ''आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.'' तसेच कलम७९ (d) नुसार "जो मोबदला घेऊन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्ट्याने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांचे चालु बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये" अशी तरतुद आहे.

- महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३१ऑगस्ट २०१७ नुसार महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम ७९ च्या खंड (ग) तिन मध्ये महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागाला सार्वजनिक प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने देण्याकरीता नियत असलेल्या अधिमुल्याच्या भाड्याच्या बाजारमुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अश्या भाड्याने किंवा महानगरपालिका लादील अश्या शर्तीस अधिन राहुन ३० वर्षाहुन अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडेपट्ट्याने देता येईल. असे नमुद आहे.

- तथापी कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU),यांचे दि. ११.०१. २०१९ चे पत्रानुसार या जागेपैकी ५१.२० मी. x२३.०० मी. = ११७७.६० चौ. मी. जागेची मागणी केलेली आहे. या जागेचे पुर्ण अधिमुल्य भरणा करण्यास सहमती असल्याने महानगरपालिका सभागृहाचे मान्यतेस सादर करण्याचा प्रस्ताव हा महानगरपालिका अधिनियम७९ (d)नुसार सादर करणे योग्य राहील असे मत आहे.

- सन २०१८—१९ वर्षाचे रेडी रेकनर दरानुसार या जागेची अधिमुल्य राशी रु. ४,०५,०९,४४०/— व यावर वार्षीक २% भु—भाटक रु. ८१०,१८९/— इतके होत आहे. सदरील राशीचा भरणा करण्यास कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU),यांची सहमती आहे.

वि.क्र.312:— विकास योजना — नागपूर.

{नगर रचना विभाग} मौजा — भामटी, खसरा क्र. ८७ येथील धरमपेठ गृह निर्माण सहकारी संस्थेच्या अभिन्यासातील भुखंड क्र. A, B व C असे एकुण ३ भुखंडके समाविष्ट असणाऱ्या जागेचा 'डिसपेन्सरी ॲण्ड मॅटरनिटी होम (एसडब्लु— १४९)' चे आरक्षण वगळून 'सार्वजनिक — निमसार्वजनिक' या उपयोगात समाविष्ट करण्याच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उपयोग फेरबदलाबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस—२४९६—२६४३—प्र.क्र.३००(अ)—९७—नवि—९, दि. ०७ जानेवारी २००० अन्वये

भागशः मंजुर झाली असून ती दि. ०१ मार्च २००० पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस —२४००—१६२८—सी.आर.—२००— नवि—९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस—२४०१—८८५—प्र.क्र.—७६/नवि—९, दि. २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मौजा—भामटी, खसरा क्र. ८७ (पार्ट) मधील ०.३८७२ हेक्टर जागेवर 'डिसपेन्सरी ॲण्ड मॅटरनिटी होम' (एसडब्लु— १४९) चे आरक्षण वगळून सार्वजनिक / निमसार्वजनिक जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम—३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे प्रस्तावित आहे. उक्त मौजा—भामटी, खसरा क्र. ८७ (पार्ट) ही जागा नागपूर सुधार प्रन्यासचे मालकीची असून मा. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना उद्देशुन असलेले पत्र क्र. सभापती/रचना/ १३१६२, दि. २२.११.२०१८ अन्वये खसरा क्र. ८७, मौजा — भामटी येथील धरमपेठ गृह निर्माण सहकारी संस्थेच्या अभिन्यासातील भुखंड क्र. A, B व C असे एकुण तीन भुखंडके समाविष्ट असणाऱ्या जागेचा 'डिसपेन्सरी ॲण्ड मॅटरनिटी होम (एसडब्लु— १४९)' चे आरक्षण वगळून 'सार्वजनिक —निमसार्वजनिक' या उपयोगात समाविष्ट करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत कळविलेले आहे. उक्त जागा नागपूर सुधार प्रन्यासचे ''भामटी परसोडी स्ट्रिट स्किम'' अंतर्गत येत असून या क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण आहे.

सबब सदर प्रस्तावातील फेर बदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव मौजा — भामटी, खसरा क्र. ८७,येथील धरमपेठ गृह निर्माण सहकारी संस्थेच्या अभिन्यासातील भुखंड क्र. A, B व C असे एकुण ३ भुखंडके समाविष्ट असणाऱ्या जागेचा 'डिसपेन्सरी ॲण्ड मॅटरनिटी होम (एसडब्लु— १४९)' चे आरक्षण वगळून 'सार्वजनिक —निमसार्वजनिक' या उपयोगात समाविष्ट करण्यास्तव महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.)

वि.क्र.313ः— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 128 (अ) अंतर्गत {कर व कर आकारणी विभाग} मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर कलम 99 (कराचे दर निश्चित करणे) या अंतर्गत पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच ते की पुढील सरकारी वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा याबाबत महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेउन फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने कार्यालयीन प्रस्ताव स्थायी समितीने ठराव क्र. 595 दिनांक 25.01.2019 अन्वये विचारात घेवून एकमताने मंजुरी प्रदान केली. करीता सन 2019—2020 हया आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दर निश्चित करण्याबाबतचा स्थायी समितीचा ठराव क्र. 595 दिनांक 25.01.2019 अन्वये खालील प्रस्ताव उचित निर्णयास्तव म.न.पा. सभागृहा समोर ठेवण्याचा प्रश्न विचारात घेणे.

महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमानुसार सन 2019—2020 मध्ये मालमत्ता करा अंतर्गत आकारावयाचे प्रस्तावित कर व त्यांचे दर

		सन 2018—2019 मध्ये प्रचलित दर		2019—2020 चे विभागाव्दारे प्रस्तावित दर	
अ.क्र.	कराचा प्रकार	वार्षिक भाडे मुल्य	कराचा दर	वार्षिक भाडे मुल्य	कराचा दर
1	सामान्य कर	1 ते 2000	14 टक्के	1 ते 2000	14 टक्के
		2001 ते 5000	18 टक्के	2001 ते 5000	18 टक्के
		5001 ते 20000	22 टक्के	5001 ते 20000	22 टक्के

		20001 ते 50000	26 टक्के	20001 ते 50000	26 टक्के
		50001 व त्याचे वर	30 टक्के	50001 व त्याचे वर	30 टक्के
2	मलजल कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	12 टक्के	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	12 टक्के
3	मलजल लाभ कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्तका
4	पाणी पट्टी कर	1 ते 2000	10 टक्के	1 ते 2000	10 टक्के
		2001 ते 5000	12 टक्के	2001 ते 5000	12 टक्के
		5001 व त्याचे वर	15 टक्के	5001 व त्याचे वर	15 टक्के
5	पाणी लाभ कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का
6	अग्निशमन कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का
7	दिवाबत्ती कर	लागु नाही		लागु नाही	
8	रस्ते (पथ) कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का
9	महापालिका शिक्षण कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का
10	वृक्ष कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	1 टक्का
या व्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स रेस्टॉरेन्टस्, मंगल कार्यालये, लॉनस व हॉस्पीटल्स या मालमत्तांवरखालील दराने वार्षिक विशेष सफाई कर आकारण्यात यावा.					
1	विशेष सफाई कर	वार्षिक भाडे मुल्य 50000 पावेतो	7 टक्के	वार्षिक भाडे मुल्य 50000 पावेतो	7 टक्के
2		वार्षिक भाडे मुल्य 50001 व त्यापेक्षा जास्त.	10 टक्के	वार्षिक भाडे मुल्य 50001 व त्यापेक्षा जास्त.	10 टक्के

महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमानुसार सन 2019—2020 मध्ये मालमत्ता करा अंतर्गत प्रस्तावित म.न.पा. चे विविध कर व त्यांचे दर

राज्य शासनाचे कर

		सन 2018—2019 मध्ये प्रचलित दर		2019—2020 चे विभागाव्दारे प्रस्तावित दर	
अ. क्र.	कराचा प्रकार	वार्षिक भाडे मुल्य	कराचा दर	वार्षिक भाडे मुल्य	कराचा दर
1	शिक्षण कर (निवासी)	1 ते 150	2 टक्के	1 ते 150	2 टक्के
		151 ते 300	3 टक्के	151 ते 300	3 टक्के
		301 ते 3000	4 टक्के	301 ते 3000	4 टक्के
		3001 ते 6000	5 टक्के	3001 ते 6000	5 टक्के
		6001 व त्याचे वर	6 टक्के	6001 व त्याचे वर	6 टक्के
2	शिक्षण कर (अनिवासी)	1 ते 150	4 टक्के	1 ते 150	4 टक्के
		151 ते 300	6 टक्के	151 ते 300	6 टक्के
		301 ते 3000	8 टक्के	301 ते 3000	8 टक्के
		3001 ते 6000	10 टक्के	3001 ते 6000	10 टक्के
		6001 व त्याचे वर	12 टक्के	6001 व त्याचे वर	12 टक्के
3	रोजगार हमी कर (फक्त अनिवासी)	1 ते 150	1 टक्का	1 ते 150	1 टक्का
		151 ते 300	1.5 टक्के	151 ते 300	1.5 टक्के
		301 ते 3000	2 टक्के	301 ते 3000	2 टक्के

		3001 ते 6000	2.5 टक्के	3001 ते 6000	2.5 टक्के
		6001 व त्याचे वर	3 टक्के	6001 व त्याचे वर	3 टक्के
4	मोठया निवासी इमारतीवरील कर	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	10 टक्के	सर्व वार्षिक भाडे मुल्यावर	10 टक्के

टिप :–

1)स्थायी समिती कडून प्रस्तावित ठराव क्र. 595 दिनांक 25.01.2019 अन्वये मंजुरी प्राप्त झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 च्या तरतूदीनूसार 20 फेब्रुवारी 2019 च्या पूर्वी म.न.पा. सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

2) या प्रस्तावामध्ये राज्य शासनाचे शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी इमारतीवरील करांच्या दरामध्ये सुद्धा कुठलाही बदल करण्यात आलेला नाही..

3) तसेच सन 2018–2019 हया आर्थिक वर्षात प्रचलित दरात चालू आर्थिक व सन 2019–2020 मध्ये कोणतीही वाढ सुचविण्यात आली नाही.

4) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.314:– {स्थावर विभाग} मनपा ठराव क्र. ३५० दि. २९.०१.२०१९ नुसार संपुर्ण विषयाची माहिती घेवून पुनःश्च सभागृहात ठेवण्यात यावा या सुचनेच्या अनुषंगाने विषयाची संपुर्ण माहिती घेण्यात आली आहे.

सबब पब्लिक प्रायवेट पार्टनरशिप अंतर्गत गोरेवाडा प्राणी संग्रहालय प्रकल्पाकरीता महाराष्ट्र वन विकास महामंडळास नागपूर महानगरपालिकेच्या व्यवस्थापनेखाली असलेल्या मौजा–गोरेवाडा येथील ख. क्र. १०६, ११३, ११८, ११९, १२०, १२१, १२२ मधील २५.५७ हे. आर. जागा ठराव क्र ७९ दि. १९.०८.२०१७ नुसार हस्तांतरीत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

परंतु नगर भुमापन कार्यालयाकडुन प्रत्यक्ष मोजणीच्या दरम्यान हस्तांतरीत करावयाचे क्षेत्रापैकी खसरा क्र. १०६ मधील १३.२९ हे.आर. जागेपैकी क्वॉर्टर्स वगळुन फक्त ११.५९ हे. आर. जागा उपलब्ध होत आहे. करीता कमी होत असलेले क्षेत्र (१३.२९ –११.५९) १.७० हे. आर. जमिन ही मौजा – गोरेवाडा, ख. क्र. ११५ (१.६८ हे. आर) ख. क्र. ११६ (०. ०१ हे. आर) व ख. क्र. ११७ (०.०१ हे.आर) मधील एकुण १.७० हे. आर. जागा महाराष्ट्र वन विकास महामंडळ लिमीटेड, नागपूर यांना मुळ ठराव क्र. ७९ दि. १९.०८.२०१७ मधील अटिवर प्रदान करण्याचा व या अनूषंगाने कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

- ठराव क्र ७९ दि. १९.०८.२०१७ नुसार महानगरपालिकेच्या व्यवस्थापना खालील २५.५७ हे. आर. जागा महाराष्ट्र वन विकास महामंडळ लिमीटेड, नागपूर यांना हस्तांतरणास मान्यता प्रदान आहे.
- उपरोक्त जागेच्या मोबदल्यात मौजा–गोरेवाडा, ख. क्र. २/१, २/२ व २/३ येथिल २५.५७ हे. आर. जागा नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात येईल.
- वन विकास महामंडळाने सदर जागेच्या वास्तविक वापरासंबंधीची ब्लु–प्रिंट व सदरील वापरामुळे गोरेवाडा तलाव प्रदुषीत होणार नाही असे हमीपत्र महानगरपालिकेला सादर करावयाचे आहे व या प्रकल्पामधुन प्राप्त उत्पन्नामधुन काही हिस्सा महानगरपालिकेला द्यवयाचा आहे.
- वन विकास महामंडळ यांना हस्तांतरीत करावयाचे क्षेत्रामध्ये ठराव क्र. ७९ अंतर्गत नमुद ख. क्र. ११८ मधील २.९७ हे. आर. नसून २.९७ एकर म्हणजेच १.२० हे. आर. असल्याचे निर्देशनास आल्यामुळे महानगरपालिका ठराव क्र. १६४ दि. ०३.०२.२०१८ अन्वये दुरुस्तीस मान्यता प्रदान आहे.
- सदर जमिनीच्या प्रत्यक्ष मोजनीवेळेस ख.क्र. १०६ मधिल १३.२९ हे. आर. जमिन हस्तांतरीत करतांना अस्तित्वातील क्वार्टर बाधीत होत आहे. सदर क्वार्टर अंतर्गतची जागा कायम ठेवण्याचे दृष्टीने या खसऱ्यालगतची ख. क्र. ११५, ११६, ११७ ची एकुण १.७० हे. आर. जागा देण्याबाबतचा प्रस्ताव आहे.
- सविस्तर माहिती नस्तीत टाचण आहे.

वि.क्र.315ः— नागपूर महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा
{जलप्रदाय विभाग} प्रणालीचे उन्नतीकरण व बळकटीकरण करणे व लोकसहभागाद्वारे (PPP तत्वावर) दिर्घ कालावधीकरीता 24x7 पाणीपुरवठा करण्याच्या मंजुर प्रकल्पीय कामासंदर्भात नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची पाणी कंपनी NESL च्या विश्वस्थांनी दि. 15.02. 2019 रोजीच्या बैठकीत ऑपरेटर मे. ओ.सी.डब्ल्यु.पी.एल. सोबत चर्चा करुन one time settlement अंतर्गत पारीत केलेल्या व स्थायी समितीने ठराव क्र. 824, दि. 21.02.2019 अन्वये दिलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप :— सविस्तर टिपप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.316ः— मौजा—गोरेवाडा येथील सर्व्हे क्र. १०६ ची एकुण जागा १९.५५
{स्थावर विभाग} हे.आर. आहे. सदर्हु जागा रिंग रोडने विभाजीत झाली असुन रिंग रोडच्या उत्तरेस सुमारे १५.०० हे.आर. व दक्षिणेस सुमारे ३.०० हे.आर. क्षेत्रामध्ये विभाजित झाली आहे. (उर्वरीत १.५५ हे.आर. रिंग रोडचे क्षेत्र आहे.) रिंग रोडच्या उत्तरेस व गोरेवाडा तलावास सलग असलेल्या सर्व्हे नं. १०६ मधील ११.५५ हे.आर. क्षेत्र वन विकास महामंडळास गोरेवाडा प्राणि संग्राहलयकरीता यापुर्वी उपलब्ध करण्यात आली आहे.

७/१२ उताऱ्याचे नोंदीनुसार गोरेवाडा सर्व्हे क्र. १०६ ची जमिनीची मुळ मालकी ही राज्य सरकारची असुन नागपूर महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागाचे व्यवस्थापनाखाली आहे. सदर जागेपैकी रिंग रोडच्या दक्षिणेस असलेल्या जागेची रितसर मोजणी करण्यात आलेली नाही. तथापि मोक्यावर सुमारे ३.०० हे.आर. जागा उपलब्ध आहे. या जागेची मागणी श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया स्कुल ट्रस्ट यांनी प्रस्तावित आंतरराष्ट्रीय स्कुल व ई—लर्निंग सेंटरकरीता पर रु. १/— प्रती चौ.फुट प्रमाणे मागणी केलेली आहे. सदर्हु संस्था ही नामांकीत संस्था असुन जागतीक दर्जाची शाळा प्रस्तावित असल्याने व याचा लाभ प्रकल्प उभारणीनंतर नागपूर शहरातील जनतेस होणार आहे. सबब मौजा—गोरेवाडा, सर्व्हे नं. १०६ या जागेपैकी रिंग रोडच्या दक्षिणेकडील सुमारे १० एकर जागा, या जागेची मुळमालकी शासनाची असल्याने व महानगरपालिकेच्या व्यवस्थापनाखाली असल्याने प्रस्तावित आंतरराष्ट्रीय शाळा व ई—लर्निंग सेंटरकरीता उपलब्ध करण्याकरीता शासनास ना—हरकत देण्याचा व नागपूर शहरातील सामाजिक, आर्थिक दृष्ट्या व दुर्बल घटकातील किमान २५ः जागा विनामुल्य या शैक्षणिक संस्थेमध्ये राखीव ठेवण्याबाबत, सविस्तर अहवाल संस्थेने सादर करणे व या अनुषंगाने निर्णयाचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

वि.क्र.317ः— सोनेगाव तलाव शहराच्या दक्षिण पश्चिम भागात असुन भोसले कालीन
{लोककर्म झोन ०१} प्राचीन तलाव आहे. तलावाचे पर्यावरणीय संवर्धनाच्या दृष्टीने नागपूर महानगरपालीकेने सोनेगाव तलाव सौदर्यीकरण प्रकल्प मंजूरीस्तव शासनाकडे सादर केला होता. नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण— 2018 /प्र.क्र. 174/ नवि 16 दि. 25/01/2019 अन्वये सोनेगाव तलाव सौदर्यीकरण प्रकल्पाच्या रू.17.32 कोटीच्या प्रस्तावास शासनाने तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडुन सोनेगाव तलाव सौदर्यीकरण प्रकल्प राबविण्यास महामेट्रोकडे हस्तांतरीत करण्याबाबत निर्देशीत केले आहे, करीता सोनेगाव तलाव सौदर्यीकरण प्रकल्प महामेट्रोकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव विचारात घेणे.

वि.क्र.318ः— मनपा ठराव क्र. ३४० दि. २९.०१.२०१९ अन्वये व्यायामशाळा
{स्थावर विभाग} आणि वाचनालयाची इमारत लीहीली आहे आणि ती आधी इमारत शाळेला दिली होती, त्यामुळे मा. आयुक्त यांनी संपुर्ण चौकशी करुन हा विषय सभागृहापुढे ठेवण्यासाठी निर्णय घ्यावा व हा विषय पुढच्या सभागृहात ठेवण्यात यावा यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या अनुषंगाने चौकशी करण्यात आली.

बॅनर्जी ले आऊट नागपूर येथील म.न.पा. च्या मराठी प्राथमीक शाळेच्या तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील ६ खोल्या रू. १८,१३५/— प्रमाणे मासीक भाडे आकारून शिक्षण विभागाव्दारे शाळा इमारत म.न.पा. ठराव क्र. १७१ दि. २६.१०.२०१५ रोजीच्या मंजुरीन्वये ५ वर्षाकरीता भाड्याने देण्यात आली आहे. उपरोक्त शाळा परिसरातील शाळेशिवाय असलेली व्यायामशाळा व वाचनालयाची इमारत भाडयाने देण्याची मागणी संस्थेव्दारे करण्यात आली असून याआधी या दोन्ही इमारती भाडयाने देण्यात आलेल्या नाहीत.

सबब मौजा बाबुलखेडा, बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील भगवाननगर मराठी प्राथमिक शाळा परिसरातील व्यायामशाळा इमारत (बांधीव क्षेत्र ७८.०८ चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधीव क्षेत्र ३३.८० चौ.मी.) या इमारती रुखमन पात्र मेमोरियल सोसायटी चे सॅक्रेड स्कूल यांना शैक्षणिक वापराकरीता अनुक्रमे रु. ९३६०/— प्रति महिना व रु.४,०५६/— प्रति महिना नुसार प्रथम ११ महिन्यांचे कालावधीकरीता आगावु भाडे भरण्याचे अटींवर प्रथम पाच वर्षाकरीता खालील नमूद अटीं व शर्थीवर भाडेतत्वावर देण्यास स्थायी समिती ठराव क्र. १५४ दि. २५.०६.२०१८ अन्वये म.न.पा. सभागृहाच्या मंजुरीकरीता पाठविण्याच्या शिफारशीसह मंजुरी प्रदान केलेली आहे. करीता सदर प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

अटीं व शर्थी :—

१. विषयांकित इमारतीची संयुक्त पाहणी स्थावर विभाग, शिक्षण विभाग व संबंधित संस्था यांचे प्रतिनीधी यांनी ताबा देण्याचे पूर्वी/ताबा परत घेण्याचे पूर्वी करुन, सविस्तर अहवाल तयार करणे.
२. सदर संस्थेला ११ महिन्यांचे एकुण भाडे आगावू भरणे बधनकारक राहील.
३. सदरील संस्थेस इमारत देखभाल/दुरुस्तीसाठी रु. २०,०००/— सुरक्षा ठेव महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.
४. इमारत परत करण्यापुर्वी सदर संस्थेनी संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे किमान आहे त्यास्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर संस्थेने हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
५. इमारत महानगरपालिकेस परत करते वेळी ज्यास्थितीत भाड्यावर घेतलेली होती त्या स्थितीत असल्यास सुरक्षा ठेव परत केली जाईल अन्यथा आवश्यकतेनुसार सुरक्षा ठेव मध्ये कपात केली जाईल.
६. सदर जागेचा व इमारतीचा उपयोग फक्त शैक्षणीक वापराकरीताच करण्यात येईल.
७. महानगरपालिकेला सदर जागा/इमारतीची आवश्यकता भासल्यास, त्या स्थितीत ३० दिवसांचे पुर्व सुचनेवर जागा/इमारत परत घेण्यात येईल.
८. इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही.
९. सदर जागेची व इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत, पाणी याबाबतची जबाबदारी संस्थेची राहील.
१०. उपरोक्तबाबत कोणत्याही निर्णया संबंधीचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचेकडे सुरक्षित राहील व संस्थेस बंधनकारक राहील.

———————————